समारोप

या प्रकरणामध्ये, रंगभूमी नियतकालिकात, मराठी नाटकांवर आलेल्या परीक्षणात्मक मजुकराची चर्चा केली. समकालीन मराठी नाटकांवरील मते त्यामध्ये व्यक्त केलेली असल्याने, त्याचे महत्त्व विशेष आहे. त्या काळात, ज्या नाटकांच्या प्रयोगांनी रंगभूमी गाजविली त्या नाटकांचे कोणते गुणविशेष त्वरित जाणवले, आणि ते कसे मांडले गेले हे अभ्यासणे आवश्यक होते. समकालीन नाटकांवरील प्रतिक्रिया, मते, हा नाट्यसमीक्षेतील ऐतिहासिक महत्त्वाचा भाग असतो. या नियतकालिकातील परीक्षणलेखात, संहिता-समीक्षा आणि प्रयोगसमीक्षा यांची सरमिसळ झालेली दिसते. कधी, एकदा संहितेच्या आधाराने तर, नंतर पुन: प्रयोग पाहून, असेही एखाद्या नाटकावर लिहिलेले दिसते. प्रयोगांवर लिहितानाही, नेमका कोणत्या दिवशीचा प्रयोग पाहून लिहिलेले आहे, त्याचा उल्लेख आहेच असे नाही. अशा मर्यादा आज दिसत असल्या तरी, त्या काळाच्या संदर्भात हे लेखन ध्यानात घ्यावयास हवे. प्रयोग समीक्षेचा स्वतंत्र सविस्तर विचार, या प्रबंधाच्या सातव्या प्रकरणात केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात ज्या नाटकांचा विचार केलेला आहे त्यावरून खालील निष्कर्ष ध्यानात येतात :-

१. नाट्यपरीक्षणांबाबत, लेखकांची दृष्टी, स्वतंत्र व स्वच्छ आहे. कोणत्याही दडपणाखाली किंवा दुसऱ्या कोणाच्या मताच्या प्रभावाखाली या लेखकांनी लिहिलेले नाही.

२. प्रतिकूल मते स्पष्टपणे, निर्भीडपणे व्यक्त केलेली आहेत. नाटककार कितीही नामवंत असला तरी, दोष दाखविण्यात कुचराई केलेली नाही. या दोषदिग्दर्शनामागे, नाट्यक्षेत्राविषयींचा अस्सल जिव्हाळा आहे असे स्पष्ट जाणवते.

३.	१८६५ मध्ये, मराठी नाटकाचे पहिले परीक्षण लिहिले गेले. तीच धाटणी रंगभूमी काळापर्यंत कायम राहिलेली दिसते. विवेचनात मात्र बारकावा आलेला आहे.
४.	संस्कृत व इंग्रजीतील नाट्यसंकल्पनांच्या मिश्रणातून मराठी नाट्यसमीक्षा आकार धारण करीत होती, असे या लेखनातून दिसते.

५.	रुपांतरित नाटकांच्याबाबत निर्माण होणाऱ्या समस्यांची विस्तृत चर्चा येथे आली, परंतु त्यासाठी एक सामान्य रुपांतरित नाटक परीक्षणासाठी निवडले आहे.

६.	ंरगभूमी पूर्वकाळात गाजलेल्या, एखाद्या मराठी नाटकाचा, पुनर्विचार करावा असे वाटलेले नाही. श्री. गो. वा. बापट यांच्यासारख्या व्यासंगी, रसिक, विद्वानाने, संस्कृत व इंग्रजी नाटकांवर परीक्षणे लिहिली, परंतु मराठी नाटकावर मात्र स्वतंत्रपणे लेख लिहिला नाही. हा, तत्कालीन विद्वानांच्या, विशिष्ट अभिरुचीचा परिणाम होता.

संदर्भ टीपा

१.	खाडिलकरांच्या नाट्यकृती - ना. सी. फडके.
२.	खाडिलकरांची तीन नाटके - गंगाधर गाडगीळ.
३.	नाटककार खाडिलकर - पु. रा. लेले.
४.	रंग. व.१, अं.१२, जुलै १९०८, पृ.३.
५.	रंग. व.२, अं.८/९/१० मार्च/एप्रिल/मे १९०९, पृ.२२
६.	तत्रैव, पृ.२२
७.	तत्रैव, पृ.२४
८.	महाराष्ट्रीय नाटककार - श्री. कृ. कोल्हटकर
	लेखक शं. बा. मुजुमदार, रंग. नवी आवृत्ती, अं. २, मे १९२७
९.	महाराष्ट्राचे दुसरे वेड - पु. रा. लेले, ‘तात्यांची राजस नायिका - पृ. ९३
१०.	गडकरी व्यक्ती व वाङ्मय - वि. स. खांडेकर, पृ. १०७-८
११.	`रेषा आणि रंग - वि. स. खांडेकर, ‘ंगभूमीचे तीन शिल्पकार, पृ. १८-१९
१२.	साहित्यसिंह श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (जीवन-गाथा), गं. दे. खानोलकर, पृ.४८८

१३. तत्रैव, पृ. ४८२-४८३
१४. समग्र केळकर वाङ्मय, १० साहित्य खंड
मतिविकार - न. चिं. केळकर, पृ. ९१० ते ९५१
१५. भारतनाट्यसमाजाचे बारावे संमलेन २९ व ३० मे १९१६ ला पुणे येथे, श्री. शंकरराव मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्याचा वृत्तान्त व अध्यक्षीय भाषण रंग. व.६, अं.९/१०, १९१६, पृ. १ ते २८, येथे आले आहे.
१६. श्री. ग. कृ. आगाशे हे मिरज संस्थानचे कारभारी होते. नाट्यव्यवसायातील व्यक्तींशी ते
संबंधित होते पण त्यात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता.

परिशिष्ट
मराठी नाटकांच्या परीक्षणांची सूची

रंगभूमी नियतकालिकात मराठीतील नाटकांवर विपुल लेखन झालेले आहे. हे लेखन नवीन नाटके स्फुट विवेचन, स्फुट विचार, प्रयोग पाहून सुचलेले विचार अशा विविध सदरांखाली आलेले आहे. या सर्वच लेखनाला परीक्षणलेखांचे स्वरुप आलेले आहे असे नव्हे. म्हणून या सदरांमध्ये नाटकांची नावे जरी आलेली असली तरी परीक्षणलेखांच्या स्वरुपाचा मजकूर ज्या नाटकांवर आलेला नाही ती नाटके या सूचीत घेतलेली नाहीत. परीक्षणलेखांच्या स्वरुपामध्ये संहितासमीक्षा, प्रयोगसमीक्षा तर कधी संमिश्रचर्चा आलेली दिसते. परीक्षणलेख आलेल्या या मराठी नाटकांची ही सूची रंगभूमी नियतकालिकाचे वर्ष, अंक, महिना, साल या क्रमाने दिलेली आहेत. यातील खूपसा मजकूर संपादकांचा आहे. ज्या लेखावर लेखकाचे नाव आहे तिथे त्या नावाचा उल्लेख केला आहे.

रंग. वर्ष १ अं. १ ऑगस्ट १९०७
१) कीचकवध
२) मतिविकार
३) सं. पुंडलिक (राजापूरकर मंडळीचे-प्रयोग समीक्षा)

रंग. वर्ष १ अं. २/३ सप्टें./ऑक्टो १९०७ १) कीचकवध

रंग. वर्ष १ अं. ५/६ डिसेंबर १९०७ जाने. १९०८ १) राष्ट्रोध्दार

रंग. १ वर्ष १ अं. ७ फेब्रु. १९०८ १) मोहनतारा
(प्रयोगसमीक्षा)

२) सं. सुविचारविजय
३) शारदा (प्रयोगसमीक्षा)

रंग. वर्ष १ अं. ८/९ मार्च/एप्रिल १९०८ १) बायकांचे बंड, न. चि. केळकर
रंग. वर्ष १ अं. १२ जुलै १९०८ १) मोहनतारा
रंग. वर्ष २ अं. १ ऑगस्ट १९०८ मनोविजय
(प्रयोगसमीक्षा)
रंग. व २ अं. २ सप्टेंबर १९०८ मतिविकार-ग. कृ. आगाशे
रंग. वर्ष २ अं. ८-९-१० मार्च/एप्रिल/मे १९०९ मोहनतारा
रंग. वर्ष ३ अं. १ ऑगस्ट १९०९ प्रभावती-रा. गो. दंडवते
रंग. वर्ष ३ अं. ४/५ नोव्हें./डिसें. १९०९ धर्मरहस्य अथवा अंत्यजोध्दार-रा. गो. दंडवते
रंग. वर्ष ३ अं. १० मे १९१०ेमगुंफा
रंग. वर्ष ४ अं. १ जाने. १९११ प्रेमशोधन-पु. रा. लेले
रंग. वर्ष ४ अं. ११ नोव्हें. १९११ कमला
रंग. वर्ष ५ अं. ३ जुलै १९१२ संजीवनी-पु. रा. लेले
रंग. वर्ष ५ अं. ४ आक्टो. १९१२ संतसखूबाई - सदाशिव
रंग. वर्ष ५ अं. ५/६ डिसें. १९१२ मत्स्यगंधा -
(प्रयोगपरिक्षण)
रंग. वर्ष ५ अं. १०/११ डिसें. १९१३ विद्याहरण - ग. कृ. आगाशे
रंग. वर्ष ६ अं. ७ डिसें. १९१५ राक्षसी महत्त्वाकांक्षा

रंग. वर्ष ६ अं. ८, १९१६ महानंदा-विनायक
(प्रयोगसमीक्षा)
रंग. वर्ष ६ अं. ११/१२, १९१६ सुंदोपसुंदाच्या साम्राज्यात
रंग. वर्ष ७ अं. १/२ १) हाच मुलाचा बाप (हे मेले
कवी!)

अनंत वामन बरवे
२) ‘विनोदा ची भाषा